दैनिक महाराष्ट्र www.esuryodaylive.com Email : suryodaykokan.123@gmail.com

# सूर्योदय

मुख्य संपादक : गंगाधर काळकुटे
नविननिश्चल देवाजी येनोरकर (विदर्भ आवृत्ती कार्यकारी संपादक)
लक्ष्मण फकिरबा कांबळे (आवृत्ती संपादक) , किरण काळे (आवृत्ती कार्यकारी संपादक)

24 तास सेवा ॥ श्री नागनाथ कृपा ॥ प्रो.प्रा.यमपुरे अशोक ✆ 8014842121
सूर्योदय मेडिकल & जनरल स्टोअर्स
CHEMIST & DRUGIST
शुगर,बीपी,थायरॉड,अस्थमा तसेच मुंबई,पुणे,औरंगाबाद, लातुर,बार्शी,सोलापुर,नगर येथील मेडिसिन मिळेल
सर्व प्रकारचे मेडिसिन घरपोच मिळतील
मन्मथस्वामी चौक,पाटोदा रोड,मांजरसुंबा ता.जि.बीड

छत्रपती संभाजीनगर || वर्ष ६ वे || अंक ९८ || रविवार ०५ एप्रिल २०२६ || RNI No.MAHMAR/2014/54581 || Postal Regd No.L/74/RNP/Beed/2019-21 || पाने ४ किंमत २ रुपये ||

# समृद्धी महामार्गालगत गॅसची सर्वांत मोठी पाईपलाईन!

मुंबई : प्रतिनिधी

आखाती देशात निर्माण झालेल्या युद्धजन्य परिस्थितीमुळे जगभरात इंधन आणि गॅसची अभूतपूर्व अशी टंचाई निर्माण झाली आहे. त्यामुळे सरकारने सध्या पाईप गॅसवर भर दिला आहे. तसेच त्या दृष्टीने समृद्धी महामार्गाच्या बाजूने समृद्धी महामार्गाच्या बांधकामाच्या वेळीच सरकारने मुंबई ते नागपूर अशी ६९४ किमी लांब नैसर्गिक गॅस वाहून नेणारी पाईपलाईन टाकण्याचा निर्णय घेतला होता. त्यानुसार ही पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले असून गेल (जीएआयएल, गॅस ऑथॉरिटी ऑफ इंडिया लि.) या कंपनीने पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण केले.

गॅस पाईपलाईनचा हा प्रकल्प पीएम गती शक्ती योजनेचा एक भाग आहे. ही पाईपलाईन देशातील पहिली सर्वात मोठी पाईपलाईन ठरली आहे. जी महामार्गासोबत युटिलिटी कॉरिडॉरमध्ये बसवली गेली. त्यामुळे फक्त तीन मीटर रुंदीच्या पट्टयात ही पाईपलाईन मुंबई ते नागपूर टाकण्यात आली.

सुमारे २४ इंच व्यास असलेली ही पाईपलाईन प्रतिदिवस १.६५ कोटी एससीएम (स्टँडर्ड क्युबिक मिटर) इतका गॅस वाहून नेणार आहे. त्यामुळे उच्च क्षमतेची ही पाईपलाईन राज्याच्या भवितव्याच्या दृष्टीने खूप महत्त्वाची आहे. यामुळे समृद्धी महामार्ग लगतची ही गॅस पाईपलाईन भविष्यात राज्याची व विदर्भाची जीवन वाहिनी बनू शकते. ही पाईपलाईन फक्त गॅस वाहतुकीसाठी नसून महाराष्ट्रातील ऊर्जा उद्योग व वाहतूक क्षेत्रात मोठा बदल घडवणारा प्रकल्प असल्याचे समोर येईल.



समृद्धी महामार्गाच्या या गॅस पाईपलाईनमुळे आतापासूनच समृद्धी महामार्ग लगत असलेल्या गावातील तरुणांमध्ये मोठा उत्साह व कुतूहल निर्माण झाले आहे. कारण त्यांना भविष्यात या गॅस पाईपलाईनपासून मोठा फायदा होणार असल्याचे सांगण्यात येत आहे. मुंबई ते नागपूरदरम्यान समृद्धी महामार्गालगत ही पाईपलाईन उभारल्याने भविष्यात या महामार्गालगतच्या गावांना सहज गॅस उपलब्ध होणार आहे. मात्र, या गॅससाठी आणखी ५ ते ६ वर्षे वाट पाहावी लागणार आहे. कारण सध्या केवळ पाईपलाईनचे काम पूर्ण झाले आहे. गॅस सप्लायसाठी बराच कालावधी लागणार आहे.

युटीलिटी कॉरिडॉरमध्ये पाईपलाईनचे फायदे?

–जमीन अधिग्रहण अतिशय कमी झाले

–पाईपलाईन टाकण्यासाठी खर्च कमी झाला

–भविष्यातील प्रकल्पांसाठी आदर्श मॉडेल तयार

–घरगुती वापरासाठी लागणारा गॅस सुमारे ९५ लाख घरांना पाईपलाईनद्वारे गॅस मिळू शकतो. –महामार्गालगतच्या जिल्ह्यांमध्ये वाहनांसाठी सीएनजी उपलब्ध होणार

–एआयडीसी व औद्योगिक क्षेत्रांना स्वस्त व सुरक्षित गॅस उपलब्ध होणार, रोजगाराच्या संधी वाढणार –पर्यावरणासाठी फायदा होणार, एलपीजी व डिझेलच्या तुलनेत कमी प्रदूषण

गॅससाठी तब्बल ५ वर्षे करावी लागणार प्रतीक्षा

गॅस पाईपलाईन टाकण्याचे काम पूर्ण झाले असले तरी प्रत्यक्षात सर्वसामान्यांना गॅस मिळण्यास विलंब लागणार आहे. गेल इंडियाच्या एका वरिष्ठ अधिका–याने सांगितले की, सर्वसामान्यांना गॅस मिळण्यासाठी अजून चार ते पाच वर्षे लागतील. कारण या ठिकाणी गॅस स्टेशन उभारणे, विविध शहरात आणि गावात गॅस पाईपलाईन टाकण्याचे नेटवर्क तयार करणे, सुरक्षितता तपासणी इत्यादी गोष्टी बाकी असल्याने ५ ते ६ वर्षांनंतर या पाईपलाईनचा फायदा होणार आहे.

## अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या क्षमतावृद्धीसाठी 'महा–साधना सप्ताह'; ८ एप्रिलपर्यंत व्यापक प्रशिक्षण मोहीम

छत्रपती संभाजीनगर, (विमाका): शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या क्षमतावृद्धीसाठी केंद्र शासनाच्या 'मिशन कर्मयोगी' अंतर्गत २ ते ८ एप्रिल २०२६ या कालावधीत 'महा–साधना सप्ताह' राबविण्यात येत असून, या उपक्रमात विभागातील सर्वांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांनी केले आहे. भारत सरकारचा क्षमता विकास आयोग आणि कर्मयोगी भारत यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या विशेष प्रशिक्षण उपक्रमात अधिकारी व कर्मचाऱ्यांनी ' कर्मयोगी भारत' पोर्टलवर लॉग इन करून किमान ४ तासांचे अभ्यासक्रम पूर्ण करावेत, असे त्यांनी स्पष्ट केले.या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे शासकीय यंत्रणेला अधिक कार्यक्षम, तंत्रज्ञानस्नेही आणि परिणामकारक बनविणे हा आहे. डिजिटल गव्हर्नन्स, वेळ व्यवस्थापन, निर्णयक्षमता वाढविणे, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता आधारित साधनांचा प्रभावी वापर या बाबींवर विशेष भर देण्यात येणार आहे.''सतत नवीन शिकणे आणि स्वत:ला अद्ययावत ठेवणे ही काळाची गरज आहे. महासाधना सप्ताह हा अधिकारी–कर्मचाऱ्यांच्या गुणवत्तावृद्धीसाठी मोठी संधी आहे. सर्वांनी नियोजनबद्ध पद्धतीने सहभाग नोंदवून यशस्वी करावा,'' असे पापळकर यांनी नमूद केले. या सप्ताहात सहभागी होत असताना अधिकारी व कर्मचारी आपले नियमित कामकाज सांभाळूनच ऑनलाईन प्रशिक्षण पूर्ण करणार असल्याने कामकाजावर कोणताही परिणाम होणार नाही, तर उलट कार्यक्षमता वाढण्यास मदत होईल, असा विश्वास त्यांनी केला.यामध्ये कृत्रिम बुद्धिमत्तेचे तीन अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना 'एआय दक्ष' बॅज, तर मार्केटप्लेसवरील विस्तारित अभ्यासक्रम पूर्ण करणाऱ्यांना 'कर्मयोगी उत्कर्ष' बॅज देण्यात येणार आहे. तसेच उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या विभागांना '–वारी २.०' मध्ये सन्मानित करण्यात येणार आहे.छत्रपती संभाजीनगर विभागातील सर्व जिल्हे, जिल्हा परिषद, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर शासकीय कार्यालयांनी या उपक्रमात १०० टक्के सहभाग सुनिश्चित करून विभागाची कामगिरी अधिक भक्कम करावी,

## परळगव्हाण येथे ऊस विकास परिसंवादास प्रतिसाद

परभणी : राज्याचे माजी मंत्री तथा आमदार अमित विलासराव देशमुख यांच्या वाढदिवसाचे औचित्य साधून तालुक्यातील परळगव्हाण येथे ऊस उत्पादक शेतक–यांसाठी विशेष परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते. एफएमसी आणि ट्वेंटीवन शुगर्स, सायखेडा यांच्या संयुक्त विद्यमाने



प्रगतिशील शेतकरी भास्करराव शिंदे यांच्या शेतावर पार पडलेल्या या कार्यक्रमात ऊस पिकाचे एकात्मिक कीड, रोग व अन्नद्रव्य व्यवस्थापनावर मार्गदर्शन करण्यात आले. याप्रसंगी प्रशांत हेगडे, रत्नाकर रेड्डी, गोपीनाथ सोगी, मदन मोहन, चंद्रशेखर आणि शरद बाबरे आदि मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.सद्यस्थितीत पूर्व हंगामी, सुरू हंगाम लागवड व खोडवा ऊस पिकाचे व्यवस्थापन करण्याबाबत माहिती देताना एफएमसीचे प्रतिनिधी प्रशांत बोराडे यांनी कंपनीचा इतिहास आणि विविध उत्पादनांची माहिती दिली. प्रफुल भुयार व सचिन मुंडे यांनी फवारणी करताना विषबाधा होऊ नये यासाठी घ्यावयाची काळजी सांगून खोडकिडीच्या व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक दाखवले. ट्वेंटीवन शुगर्सचे ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद येळकर यांनी ऊस पिकामधील चाबुक काणी व्यवस्थापनासाठी प्रादुर्भावग्रस्त ऊसाचे बेट मुळासकट उपटून ते प्लास्टिकच्या पिशवीत घेऊन सुरक्षितपणे नष्ट करावे, जेणेकरून बुरशीचे बीजाणू इतर पिकावर पसरणार नाहीत, असे आवाहन केले.

काणी रोगाच्या व्यवस्थापनासाठी अ‍ॅझॉक्सीस्ट्रॉबीन अधिक डायफेनोकोनाझोल हे संयुक्त बुरशीनाशक १० मिली प्रति १० लिटर पाण्यातून फवारण्याचा सल्ला दिला. पोंगेमर व्यवस्थापनासाठी क्लोरअँट्रानिलीप्रोल (१८.५ टक्के एस.सी.) १५० मिली किंवा क्लोरॅनट्रॅनिलिप्रोल १५.७५ टक्के अधिक क्लोथियानिडिन २६.२५ टक्के एससी हे पूर्वमिश्रित कीटकनाशक यापैकी कोणतेही एक कीटकनाशक ४०० लिटर पाण्यामध्ये मिसळून आळवणी करण्याबाबत त्यांनी तांत्रिक माहिती दिली. गवताळ वाढ रोग व्यवस्थापनाबाबत उपायोजना येळकर यांनी सुचवल्या. यावेळी प्रत्यक्ष शेतामध्ये तिर्राक्टो या नवीन कीटकनाशकाचा वापर केलेल्या आणि न केलेल्या क्षेत्रातील तफावत दाखवून प्रशांत बोराडे यांनी योग्य कीटकनाशकाची निवड करण्याचे महत्त्व पटवून दिले. यशस्वीतेसाठी वैभव सूर्यवंशी, ज्ञानेश्वर कणसे, आदित्य शेवाळे यांनी परिश्रम घेतले. आमदार अमित देशमुख यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित या विधायक उपक्रमाला परिसरातील शेतक–यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## बनावट पद्धतीने पिकवलेले २०० किलो आंबे जप्त

हैदराबाद : भारतातील विविध भागात आता हळूहळू फळांचा राजा असलेल्या आंब्याची चाहूल लागली आहे. आंब्याचा हंगाम सुरू होत असतानाच, ग्राहकांच्या आरोग्याशी खेळ करणारा एक प्रकार समोर आला आहे. हैदराबादमध्ये एका रॅकेटचा पोलिसांनी पर्दाफाश केला आहे. हैदराबादमधील बाजारपेठांमध्ये विक्रीसाठी



आणलेले तब्बल २०० किलो बनावट पद्धतीने पिकवलेले आंबे पोलिसांनी जप्त केले असून, याप्रकरणी एका फळविक्रेत्याला अटक करण्यात आली आहे.मिळालेल्या माहितीनुसार, खाद्य सुरक्षा अधिकारी आणि पोलिसांनी संयुक्तपणे शहराच्या विविध भागांत छापे टाकले. या कारवाईदरम्यान कॅल्शियम कार्बाईडसारख्या घातक रसायनांचा वापर करून आंबे पिकवले जात असल्याचे समोर आले. रसायनांच्या मदतीने आंबे वेळेआधीच पिवळेधमक आणि आकर्षक दिसतील असे केले जात होते, जेणेकरून ग्राहकांना आकर्षित करता येईल. पोलिसांनी घटनास्थळावरून २०० किलो आंबे आणि रसायनांची पाकिटे जप्त केली आहेत. वैद्यकीय तज्ज्ञांच्या मते, कॅल्शियम कार्बाईडने पिकवलेले आंबे खाल्ल्याने घसा खवखवणे, पोटात दुखणे, उलट्या आणि जुलाब यांसारखे त्रास होऊ शकतात. दीर्घकाळ अशा फळांचे सेवन केल्यास मज्जासंस्था आणि श्वसनाच्या गंभीर आजारांचा धोका संभवतो.हैदराबाद पोलिसांनी नागरिकांना सावध राहण्याचे आवाहन केले आहे. नैसर्गिक रीत्या पिकलेल्या आंब्याचा रंग सर्वत्र एकसारखा नसतो. जर आंबा बाहेरून पूर्णपणे पिवळा आणि आतून कच्चा किंवा चवीला वेगळा लागत असेल, तर तो रसायनांनी पिकवलेला असू शकतो, असे पोलिसांनी सांगितले. ग्राहकांनी फळे खरेदी करताना अधिक सावधगिरी बाळगावी आणि संशयास्पद वाटल्यास प्रशासनाशी संपर्क साधावा, असेही स्पष्ट करण्यात आले आहे. बाजारातील वाढत्या मागणीचा फायदा घेण्यासाठी व्यापारी अशा अनैतिक मार्गांचा अवलंब करत असल्याने कडक कायदेशीर कारवाई करण्याचे संकेत प्रशासनाने दिले आहेत.

## बी मयुरेश दिग्दर्शित '' इशकाच पैंजण '' या मराठी गाण्याचे झाले लॉन्चिंग ३ मार्चला विन्मय म्युझिक चॅनलवर गाणे झाले प्रदर्शित

अंजनगाव सुर्जीचा सुरजङ्ग मुरकुटे ची मुख्य भूमिका ङ्गङ्गङ्गअंजनगाव सुर्जी येथे नुकतेच बी मयुरेश दिग्दर्शित '' ईशकाच पैंजण '' या मराठी गाण्याचे प्रमोशन दिनांक ३ मार्चला झाले असून '' ईशकाच पैंजण '' हे मराठी गाणे ३ मार्चला दुपारी ३ वाजता विन्मय म्युझिक मराठी चॅनलवर प्रदर्शित करण्यात आले यामध्ये अंजनगाव सुर्जीचा सुरज मुरकुटे याने आपली मुख्य कलाकारांची भूमिका प्रदर्शित केली आहे.सदरचे प्रदर्शित झालेल्या गाण्याला जास्तीत जास्त प्रेक्षकांनी पाहून प्रेम दिले असेच आणखी पुढे लाईक व सबस्क्राईब करून प्रेम द्यावे असे दिग्दर्शक बी मयुरेश,अभिनेता सुरज मुरकुटे,अभिनेत्री मानसी कांबळे यांनी विनंती केली आहे.ङ्गगाण्याचे संपूर्ण प्रदर्शन हे विदर्भाचे नंदनवन चिखलदरा येथे झाले असून यामध्ये विदर्भातील अंजनगाव सुर्जी येथील शिवाजी महाराज फेम, विविध मुव्ही मध्ये काम करणारा कलाकार सुरज मुरकुटे याने अभिनेता तर पश्चिम महाराष्ट्रातील



पुणे येथील स्टार मानसी कांबळे हिने अभिनेत्री म्हणून काम केले आहे.३ मार्चला ✻ इश्काच पैजण ✻ हे मराठी गाणे विनय म्युसिक चॅनलवर प्रदर्शित झाले असल्याने या गाण्याला जास्तीत जास्त लोकांनी लाईक व सबस्क्राईब करून पसंती व प्रसिद्धी द्यावी तसेच प्रेम द्यावे असे आवाहन दिग्दर्वक बी मयुरेश,सुरज मुरकुटे यांनी केले आहे.याप्रसंगी अंजनगाव सुर्जी येथील संत रुपलाल महाराज कॉम्प्लेक्स मधील आकर्षण स्टुडिओत व शहरात डेमो देऊन गाण्याचे प्रमोशन करण्यात आले. यावेळी दिग्दर्शक बी मयुरेश,अभिनेता सुरज मुरकुटे, डिओपी सोपान सगणे, मेकअप आर्टिसट वैष्णवी कोठे,छाया चित्रकार सोपान सगणे,एच सुरज, प्रॉडकशन प्रोडूसर मोहिनी मुरकुटे,मयूर दाभाडे, छगन पवार, फोटोग्राफर सुमित भावे, मयूर दाभाडे, दिव्या, सानू, आर्ट कलाकार मोहिनी मुरकुटे, अक्षय आवनकर, शुभम सोमकुवर, डिझायनर तुषार राजपूत निखिल पवार, पायल गुंडाळी कृतिका देशमुख, रसिका देशमुख, जानवी माकोडे, मयूर स्वयम, आकांक्षा जयसिंगपूरे, आरोही वानखडे, कनिका मानकर, निकिता चंदानी, सोहम करतारी,वैष्णवी कोथें,आकाश फुकट आदित्य ढोके, पवन पाठक,छगन पवार,शिवम पाठक, ऐश्वर्या खंडारे, संगीतकार वासुकी वक्ते, पियुष पलक गुरु वंदन रेकॉर्डिंग स्टुडिओ अकोट ई टीम ह्यावेळी उपस्थित होती.

सूर्योदय
रविवार ०५ एप्रिल २०२६

संपादकीय

## नारळ लागवडीतून कोकणच्या अर्थव्यवस्थेला बळ

समुद्रकिनारी असलेल्या नागरिकांनी जास्तीत जास्त नारळाची लागवड करावी. यामुळे नारळ प्रक्रिया उद्योगाला चालना मिळून स्थानिक लोकांना रोजगार मिळणार आहे. ज्यामध्ये शेतकऱ्यांना जोडधंदा मिळणार आहे. कामगारांच्या रिकाम्या हातांना काम मिळणार आहे. नारळ विक्रीमुळे व्यापारी वर्ग निर्माण होणार असून नवनवीन नारळ उद्योजक निर्माण होणार आहेत. त्यामुळे कोकणची वेगळी ओळख जगात होणार आहे.

जगामध्ये जवळजवळ ९३ देश नारळाचे उत्पादन घेतात. आपल्या महाराष्ट्र राज्यात नारळ उत्पादनाचा विचार करता राज्यात ३३ हजार हेक्टरवर नारळाचे लागवडीखाली क्षेत्र असून १७ हजार ९२९ हेक्टर सर्वाधिक क्षेत्र सिंधुदुर्ग जिल्ह्यात आहे, तर कोकणात दरवर्षी अंदाजे नारळाचे रुपये १८.६३ कोटींचे उत्पादन होत असून सिंधुदुर्ग जिल्ह्यात रुपये १ हजार ४५७ लाख नारळाचे उत्पादन होत असते. ही माहिती प्रादेशिक नारळ संशोधन केंद्राचे कृषी विद्यावेत्ता डॉ. किरण मालशे यांनी २०२३ साली दिली होती. म्हणजे अजून चांगल्या प्रकारे नारळाची लागवड केल्यास नारळाच्या उत्पादनात वाढ होऊन कोकणच्या अर्थव्यवस्थेला अधिक बळ मिळेल.

आज नारळाचा विचार केल्यास नारळाच्या उत्पादनात घट होऊन नारळाच्या किमती जवळजवळ तिप्पट झालेल्या दिसत आहेत. तर नारळाच्या तेलाची किंमत रुपये ६०० प्रति लिटर झाली आहे. याला कारण रोगराई, बदलते हवामान, अपुरे पाणी आणि माकडांचा वावर होय. असे असले तरी कोकणात चांगले नारळाचे उत्पादन होते. तेव्हा नारळ उत्पादनाकडे व्यवसायाच्या दृष्टीने पाहिल्यास उत्तम प्रकारे बळ कोकणच्या अर्थव्यवस्थेला मिळू शकते. त्यासाठी योग्य प्रकारे नारळाची लागवड करायला हवी. म्हणजे नारळाच्या उत्पादनात वाढ झाल्यामुळे कोकणच्या उत्पन्नात अधिक चांगल्याप्रकारे वाढ होऊ शकते. तेव्हा नारळ कितीही महाग झाला तरी कोकणी माणूस खोबऱ्याशिवाय जेवण करीत नाही. नारळाचा विचार केल्यास अनेक लोकांचा संसार नारळाच्या व्यवसायावर अवलंबून असतो. सध्यातरी हा व्यवसाय कोकणात शेतकऱ्यांचा पूरक जोडधंदा म्हणून ओळखला जातो. काही शेतकरी शेतीच्या बाजूने नारळाची रोपे लावतात. काहींची तर नारळाची स्वतंत्र बाग आहे. एक माड जरी असला तरी त्याचा अनेक प्रकारे उपयोग होऊ शकतो. तेव्हा नारळाच्या व्यवसायामुळे अनेक रोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत. त्यासाठी नारळाची अधिक प्रमाणात लागवड करणे गरजेचे आहे. आपण नारळ जरी म्हणालो असलो तरी त्याच्या विविध भागांचा उपयोग नागरिकांच्या उपयोगासाठी होत असतो. त्यामुळे नारळाच्या झाडाला 'कल्पवृक्ष' म्हणतात. असे आपण प्राथमिक शाळेत शिकलो आहोत. तेव्हा नारळाच्या झाडाचे योग्य प्रकारे संगोपन आपल्याला करावे लागेल. कारण त्याच्या प्रत्येक भागाचा उपयोग वेगवेगळ्या प्रकारे केला जातो. आता आपण नारळाच्या झाडांच्या विविध भागांचा उपयोग कसा केला जातो किंवा नागरिकांना होतो याविषयी माहिती घेऊ. त्यामुळे नारळाच्या झाडाला खऱ्या अर्थाने कल्पवृक्ष म्हणतात हे वाचक वर्गाच्या लक्षात येईल.

घाटमाथ्यावर आवडीने शेंगदाणे जेवणात वापरतात त्याप्रमाणे कोकणात ओल्या खोबऱ्याचा जेवणात वापर केला जातो. कोवळ्या नारळाचे पाणी लोक आवडीने पितात. कोकणात त्याला शहाळे असेही म्हणतात. खोबऱ्यापासून तेल व दुधसुद्धा तयार करतात. तेल काढल्याने सुखी पेंडसुद्धा मिळते. करवंटीचा वापर डवली व कोळशासाठी केला जातो. नारळ सोलल्यानंतर त्यांची सोडणा मिळतात ती पाण्यात फुगत घातली जातात. त्यानंतर त्याचा काथ्या तयार केला जातो. त्यापासून दोरी, ब्रश, जाळी, चटई इत्यादी वस्तू तयार केले जातात. नारळाच्या पानापासून सुंदर छप्पर किंवा जाळी बनवली जातात. त्याच्या हिरापासून झाडू बनवितात. हिराच्या झाडूलासुद्धा बाजार पेठेत बऱ्यापैकी मागणी असते. नारळाचे जे खोड असते त्यापासून घरासाठी वासे तयार केले जात असून आकर्षक फर्निचरसुद्धा तयार करतात. कोकणात खाडीशेजारी जी बैठी घरे आहेत त्यांना सर्रास माडाचे वासे दिसतील. खारी हवा असल्यामुळे वासेसुद्धा जास्त दिवस टिकतात. तेव्हा नारळाचा विचार केल्यास शेतकऱ्यांसाठी उपयुक्त शेतीला जोडधंदा आहे. तसेच उपजीविकेचे प्रमुख साधन आहे असे म्हणावे लागेल.

कोकणात नदी-नाल्यांच्या कडेला, खाडी व समुद्राच्या काठावर डोलणारी नारळाची झाडे दिसतील तशी त्याची काळजीसुद्धा घेतली जाते.



नागोठणे शहराची ग्रामदेवता आई जोगेश्वरी माता व भैरवनाथ महाराज यांची पालखी आपल्या निवासस्थाना जवळ आली असता पालखीचे दर्शन व पालखीला खांदा देत असताना मनसे जिल्हा संघटक गोवर्धन भाई पोलसानी, कोळी समाज नेते वामन दादा कोळी आदी भक्तगण दिसत आहेत.ङ्ग(छाया-: नारायण म्हात्रे)

# शिवगांव - नावंढेवाडी येथे श्री हनुमान जन्मोत्सव साजरा

कर्जत: जयेश जाधव

खालापूर तालुक्यातील शिवगांव नावंढेवाडी गावाला वारकरी संप्रदायाचा वारसा लाभल्याने या गावात वर्षभर अनेक धार्मिक कार्यक्रम पार पडत असताना गेल्या ३९ वर्ष या गावात श्री हनुमान जन्मोत्सव पार पडत असताना याही वर्षी मोठ्या दिमाखात २ एप्रिल रोजी ह.भ.प. कृष्णा महाराज लांबे यांच्या प्रेरणेने व ह.भ.प. मोहन महाराज सनस यांच्या नेतृत्वाखाली गावकरी आणि भाविक भक्तांच्या सहकार्यातून हरिनामाच्या गजरात हा सोहळा संपन्न झाल्याने संपूर्ण गाव हरिनामाच्या गजराने दुमदुमून गेल्याने या सोहळ्यातून समाज प्रबोधनाचे कार्य शिवगांव नावंढेवाडी गावातील ग्रामस्थ व तरुणांनी केल्याने

या कार्यक्रमाला विभागातील भक्तांनी मोठी गर्दी करत दर्शन असून किर्तन रुपी सेवेतून ह.भ.प. ओंकार महाराज सूर्यवंशी आपले विचार मांडताना म्हणाले की, तरुणांनो वाईट मार्गाचे व्यसन करू नका व्यसन करायचे असेल तर परमात्म्याचे नामस्मरणाचे व्यसन करा, त्यातून भविष्य चांगले घडेल, त्यातून खऱ्या अर्थाने जीवनाचा अर्थ करून भविष्य चांगले घडेल असे म्हणाले.ङ्ङयामध्ये सकाळी श्री हनुमान जन्मोत्सव व श्री चे अभिषेक, सत्यनारायणाची महापूजा, महाप्रसाद, श्रीची पालखी मिरवणूक, हरिपाठ, दीपोत्सव, महाआरती, हरीकिर्तन व भजन असे विविध धार्मिक कार्यक्रम पार पडले.ङ कर्जत व खालापुर तालुक्याच्या वेशीवर वसलेले खालापुरातील छोटेसे गाव म्हणजे शिवगांव नावंढेवाडी गाव. हे गाव छोटेसे असले तरी, हे गाव नेहमीच आपल्या विविध धार्मिक कार्यक्रमातून समाजापुढे आदर्श निर्माण करत असताना येथील ग्रामस्थ व तरुणाई राजकीय मतभेद बाजूला सारत गेल्या ३९ वर्ष या गावात दरवर्षी श्री हनुमान जन्मोत्सव मोठ्या दिमाखात साजरा करत गावात या उत्सवाच्या माध्यमातून एकोपा आणण्याचे प्रयत्न करत असल्याने या गावात हा उत्सव नेहमीच आनंददायी वातावरण निर्माण करीत आहेत. तर याही वर्षी २ मार्च रोजी हरिनामाच्या गजरात भक्तीभावाने श्री हनुमान जन्मोत्सव पार पडला असता गावात नवचैतन्य पसरले होते. तसेच हरी किर्तन सेवेतून ह.भ.प. ओंकार महाराज सूर्यवंशी हे पुढे बोलताना म्हणाले की, सप्ताहाच्या कार्यक्रमात कोणीही राजकारण करू नका.




परमात्माचे काम करत असताना कोणीही स्वार्थ पाहू नये. परमात्माच्या नामस्मरणातूनच उज्वल भविष्यासाठी पिढी उभी राहणार असून हे काम पार पडत असताना नाराज होऊ नये. तर वारकरी संप्रदायाच्या शिकवणी मुलेच आजची तरुणाई योग्य दिशेने वाटचाल करत आहे ही वाटचाल पुढे अशीच चालू राहावी यासाठी सर्वांनी वारकरी संप्रदायाचे ज्ञान आत्मसात करावे असे सूर्यवंशी महाराज यांनी कीर्तन सेवेतून ज्ञानदानाचे कार्य करत शिवगांव - नावंढेवाडी गावातील तरुण वर्ग, ग्रामस्थ व महिलांच्या एकोप्याचे कौतुक केले.

# डोंबिवली - अखेर पी अँड टी कॉलनीतील पाणी प्रश्न मिटला

डोंबिवली : कल्याण डोंबिवली महानगरपालिकेच्या सर्वसाधारण सभेत भाजपा नगरसेविका ऍड. कविता मिलिंद म्हात्रे यांनी त्यांच्या प्रभागातील पाणी प्रश्न उपस्थित केला होता. आपल्या प्रभागातील पाणी प्रश्न सोडविण्यासाठी पालिका प्रशासनाकडे पाठपुरावा केला. या पाठपुराव्याला यश आले असून येथील पाणी प्रश्न सुटल्याचे नगरसेविका ऍड. म्हात्रे यांनी स्पष्ट केले. जनतेला दिलेला शब्द पुर्ण केला असून भाजपने करून दाखवलं अशी चर्चा होत आहे.

दरम्यान कल्याण डोंबिवली महानगरपालिकेकरता स्वतंत्र धरण असावे अशी मागणी नागरिकांनी केली असता भाजपा पदाधिकारी मिलिंद म्हात्रे यांनी भाजपा प्रदेश अध्यक्ष रविंद्र चव्हाण हे प्रयत्न करत असून नक्कीच स्वतंत्र धरण होईल असा विश्वास व्यक्त केला आहे.




पूर्वेकडील पी अँड टी कॉलिनी येथील काही इमारतींना अनेक दिवसांपासून पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. येथील नगरसेविका ऍड. कविता म्हात्रे व भाजपा पदाधिकारी मिलींद म्हात्रे यांच्याकडे येथील राहिवाशांनी आपली हि समस्या मांडली.

पी अँड टी कॉलिनी येथे काही इमारतीत पाणी कमी दाबाने येत असल्याने रहिवाशी वैतागले होते. येथील रहिवाशांनी भाजपा नगरसेविका ऍड.कविता म्हात्रे यांना पाणी समस्येबाबत माहिती दिली. नागरिकांच्या या गांभीर समस्येवर भाजपा नगरसेविका ऍड. म्हात्रे यांनी प्रशासनाकडे सतत पाठपुरावा केला. येथे एकच पाणी लाईन असल्याची माहिती मिळताच नगरसेविका ऍड. कविता म्हात्रे व भाजपा पदाधिकारी मिलिंद म्हात्रे यांनी पालिकेच्या पाणी पूरवठा विभागाकडे मागणी करुन आणखी एक पाण्याची लाईन मंजूर करून घेतली.पी अँड टी कॉलिनी प्रभाग पाणी टँकर मुक्त होणार !

कॉलनीत पाणी नाही म्हणून पाणी टँकर मागवित असल्याने त्यांच्या खिशाला भुर्दन्ड बसत होता. पाणी टँकर मुक्त प्रभाग हे स्वप्न यामुळे पुर्ण झाले असे महिला सांगत आहेत.

# शिल्पाला आकार देऊन स्वप्नातलं घर साकारतो तो शिल्पकार- वसंत उदेग सन्मान शिल्पकाराचा २०२६' कार्यक्रमात सुमारे २ हजार शिल्पकारांचा सन्मान

चिपळूण:- शिल्पकार म्हणजे दगडाला (शिल्प) आकार देणारा, त्याच्या शिल्पामध्ये रूपांतर करणारा म्हणजे शिल्पकार होय. खडी, वाळू, सिमेंट, लोखंड व इतर इमारती सामान एकत्रित करून सुंदर, सुबक आणि आपल्या आयुष्यातलं मनाला भावलेला असं सुंदर घर बनवणारा शिल्पकार म्हणजे कॉन्ट्रॅक्टर बंधू, ते आपण सगळे शिल्पकार आहात, म्हणूनच आपला हा सन्मान केला जात आहे, असे गौरवोद्गार श्री दत्त एजन्सीज्‌चे मालक, उद्योजक वसंत उर्फ दादा उदेग यांनी काढले. शहरातील धवल प्लाझा येथे शुक्रवारी दि. ३ एप्रिल रोजी आयोजित 'सन्मान शिल्पकाराचा २०२६' कार्यक्रमात उपस्थित सर्व शिल्पकारांना मार्गदर्शन करताना उद्योजक वसंत उदेग बोलत होते.ङ्गउपस्थित सर्व शिल्पकारांचा शब्दसुमनाने गौरव करताना उद्योजक वसंत उदेग म्हणाले की, प्रत्येक यशस्वी पुरूषाच्या मागे स्त्री ही पत्नी म्हणून भक्कमपणे पाठिशी उभी असते, त्यामुळे सर्व शिल्पकारांचा याठिकाणी सपत्नीक गौरव केला जाणार आहे. दत्त एजन्सीज्? म्हणजे नुसतं व्यापार, बिझनेस आणि सेवा नाही, तर दत्त एजन्सीज्? म्हणजे तुमच्या-आमच्यातलं एक परिवाराचं नातं आहे. व्यापार तर होत राहील, सेवा करणे हे आपलं कर्तव्यच आहे, परंतु परिवारातलं नातं जपणं किंवा एकमेकांना परिवारातलं मानणं हे सगळ्यात श्रेष्ठ आहे, असेही उद्योजक दादा उदेग यांनी आपल्या भाषणात सांगितलं.या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून श्री सिमेंट कंपनीचे महाराष्ट्र स्टेट हेड अवतार सिंग उपस्थित होते. तर व्यासपीठावर टेक्निकल स्टेट हेड सुनील शिंदे, विसाका इंडस्ट्रीज लिमिटेड श्री. शेवकरी, केडी ओसवाल नामांकित पेढीचे चेअरमन दिलीप ओसवाल, परमेश्वरी ट्रेडिंग कंपनीचे भरत शाह, परमेश्वरी पनवेल टाईल्सचे जयेश शाह, ओझोन वॉटर टँक सातारा येथील अजय जाधव, दयाळ उदेग, सौ. श्रद्धा उदेग, सौ. वर्षा उदेग आदी मान्यवर उपस्थित होते.प्रमुख अतिथी अवतार सिंग यांनी शिल्पकारांचा गौरव करताना सांगितले की, कोणत्याही वास्तूमध्ये प्राण ओतणे अथवा एखाद्या प्लान्टला आकार देतो तो म्हणजे शिल्पकार होय. आणि इथे उपस्थित असलेले सर्व शिल्पकार हे तुम्हीच आहात, अशा शब्दात गौरवोद्गार काढले. श्री सिमेंट लिमिटेडचे संपूर्ण भारतात २५ प्लान्ट असून रत्नागिरी जिल्ह्यात श्री सिमेंट नंबर वन असल्याचा उल्लेखही अवतार सिंग यांनी आपल्या भाषणात केला. तसेच उद्योजक वसंत उदेग यांचेही त्यांनी भरभरून कौतुक केले. वसंत उदेग यांनी उद्योग क्षेत्राबरोबरच शेतीतही क्रांती केली असल्याचे श्री. सिंग यांनी सांगितले. यावेळी उपस्थित सर्व शिल्पकारांचा मान्यवरांच्या हस्ते भेटवस्तू देऊन सपत्नीक यथोचित सन्मान करण्यात आला.या कार्यक्रमाला खेर्डीतील समृद्धी वॉटरचे नंदू ठोकले व अभिजित बनसोडे, श्री सिमेंट कंपनीचे जिल्हा प्रतिनिधी राहुल पडोळे, रत्नागिरी सेल्स ऑफीसर श्री. मांजरेकर, टेक्निकल ऑफीसर संग्राम लिमकर, महाराष्ट्रातील नामवंत ट्रान्स्पोटर श्री. रावराणे, श्री सिमेंट कंपनीचे सेल्स ऑफीसर गुरूनाथ लोके, श्री. मुंडे, डॉ. फिक्सिट रॉफ टाईल्सचे श्री. संदीपभाई, भूषण मोरे, भार्गवी एन्टरप्रायजेसचे प्रभंजन पिंपुटकर, विसाका इंडस्ट्रीज लिमिटेडचे श्री. मोहसीन, गॅलक्सी डोअर कोल्हापूरचे श्री. कमलेश, श्री. सावन, बर्जर पेंट्सचे किरण देवकाते, इंडिगो पेंट्सचे किरण रहाटे, उद्योजक विलास खेराडे,आरडीसी बँकेचे सेवानिवृत्त मॅनेजर प्रकाश खेडेकर आदी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अमोल टाकळे यांनी केले. तर उपस्थितांचे आभार उद्योजक वसंत उदेग यांनी मानले.




## मुंब्र्यात भरदिवसा गोळीबार; बहिणीच्या छेडछाडीच्या रागातून भावाची थरारक कारवाई, एक ठार दोघे गंभीर जखमी

ठाणे,(प्रतिनिधी): ठाण्यातील मुंब्रा परिसरात भरदिवसा झालेल्या गोळीबाराच्या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे. बहिणीची छेड काढल्याच्या रागातून एका तरुणाने तिघांवर गोळीबार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या घटनेत एकाचा जागीच मृत्यू झाला असून दोघे जण गंभीर जखमी झाले आहेत.ङ्गमिळालेल्या माहितीनुसार, मुंब्र्यातील सुमनताई चव्हाण हिंदी शाळेजवळ ही घटना घडली. अकबर शेख असे मृत पावलेल्या तरुणाचे नाव असून अब्दुल शेख आणि समीर शेख हे दोघे जखमी झाले आहेत. त्यांची प्रकृती चिंताजनक असल्याची माहिती आहे.ङ्गगेल्या काही दिवसांपासून संबंधित तिघे जण आरोपीच्या मानलेल्या बहिणीची वारंवार छेड काढत होते. या त्रासाला कंटाळून तरुणीने ही बाब आपल्या मानलेल्या भावाला सांगितली. त्यानंतर संतप्त झालेल्या भावाने बदला घेण्याच्या उद्देशाने हल्ल्याचा कट रचल्याचे समजते.ङ्गघटनेच्या दिवशी तिघेही शाळेजवळ असताना आरोपीने त्यांच्यावर अचानक गोळीबार केला. यात अकबर शेख याचा जागीच मृत्यू झाला, तर इतर दोघांना गंभीर अवस्थेत रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.ङ्गगोळीबाराच्या आवाजामुळे परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले असून नागरिकांमध्ये घबराट पसरली. घटनेची माहिती मिळताच मुंब्रा पोलिसांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थिती नियंत्रणात आणली.ङ्गया प्रकरणी पोलीस अधिक तपास करत असून आरोपीचा शोध सुरू आहे.



# लोकरंग

१ साप्ताहिक संवाद

सरकारी सेवा एकाच मंचावर

राज्यात डिजिटल गव्हर्नन्स अधिक सक्षम व नागरिककेंद्रित करण्यासाठी महाराष्ट्र शासनाने वन स्टेट, वन पोर्टल, वन वेब ॲड्रेस ही



महत्त्वाकांक्षी संकल्पना पुढे आणली आहे. त्या अंतर्गत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस याच्या महासारथी पोर्टलचे हस्ते बुधवारी लोकार्पण करण्यात आले. या उपक्रमामुळे विविध शासकीय सेवा एकाच मंचावर उपलब्ध होऊन नागरिकांना जलद, पारदर्शक आणि सुलभ सेवा मिळणार आहेत.याच अनुषंगाने राज्याचे मुख्य सचिव राजेश अग्रवाल यांच्याशी आजचा साप्ताहिक संवाद.

१ महासारथी पोर्टल या प्रणालीचा उद्देश काय आहे?

सर्व शासकीय विभागांचे डिजिटल प्लॅटफॉर्म एकत्र आणून एकसंध प्रणाली तयार करण्याचा शासनाचा उद्देश आहे. महा आयडी आधारित सिंगल साइन-ऑन प्रणालीमुळे नागरिकांना वारंवार कागदपत्रे सादर करण्याची गरज राहणार नाही. तसेच नागरिक नोंदणी प्रणालीमुळे जात

प्रमाणपत्र, रेशन कार्ड यांसारखी पडताळलेली माहिती सुरक्षित पद्धतीने एकत्रित केली जाणार आहे. राज्यातील सर्व विभाग हळूहळू महा आयडीशी जोडले जाणार असून यामुळे कामकाजात गती, कागदपत्रांची बचत आणि पारदर्शकता वाढणार आहे. डेटा सुरक्षा आणि गोपनीयतेसाठी

डिजिटल पर्सनल डेटा प्रोटेक्शन ॲक्ट २०२३,




आधार कायदा २०१६ आणि माहिती तंत्रज्ञान कायदा २००० या कायद्यांचे पालन करण्यात येणार आहे,.

२ विविध क्षेत्रातील सेवा जलद करण्यसाठी ए आयचा वापर देखील होणार आहे?

कृत्रिम प्रज्ञा (एआय), एजेंटिक एआय आणि ब्लॉकचेनसारख्या नव्या तंत्रज्ञानाचा वापर करून शेतीसह विविध क्षेत्रांत सुधारणा करण्याचा सरकारचा मानस आहे. पुढील १५० दिवसांत दुसऱ्या प्रज्ञा टप्प्याची अंमलबजावणी करण्यात येणार असून सेवा अधिक जलद आणि पारदर्शक करण्यावर भर दिलाजाणार आहे. दरम्यान, नागरिकांच्या सोयीसाठी १८ महत्त्वाच्या सेवांचे सूलभीकरण, अर्जाची टप्प्याटप्प्याने ट्रैकिंग व्यवस्था, आयव्हीआरएस आधारित फीडबैक प्रणाली, एकत्रित डॅशबोर्ड, सिटिझन चार्टर आणि महाआयटी संवाद मासिक यांसारखे उपक्रमही सुरू करण्यात आले आहेत.

३ या नव्या प्रणालीमुळे राज्याचा कारभार वेगाने होईल का?

आपले महाराष्ट्र राज्य हे वेगाने प्रगती करत असून आपले सरकार सारख्या उपक्रमांमुळे सेवा नागरिकांपर्यंत पोहोचत आहेत. गव्हन्मेंट प्रोसेस री-इंजिनीअरिंगमुळे प्रक्रिया सुलभ होत असून सेवा वितरणाचा कालावधी कमी होत आहे. तर महासारथी हा डेटा-आधारित प्रशासनासाठी सिंगल सोर्स ऑफ टुथठरणार असून विविध विभागांमध्ये समन्वय वाढवून योजनांचा लाभ योग्य लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवण्यास मदत होणार आहे. कागदरहित प्रशासनासाठी मुख्यमंत्री डॅशबोर्ड आणि महाराष्ट्र इंटिग्रेटेड डेटा एक्स्चेंज यांसारख्या उपक्रमांचाही वापर केला जाणार आहे,

२ नोंद

आउटलेट मॉल देणार महाराष्ट्रातील डिस्काउंट शॉपिंगला नवी दिशा

भूमी वर्ल्ड महाराष्ट्रातील पहिला डेडिकेटेड आउटलेट मॉल, आउटलेट मॉल ऑफ इंडिया सुरु करण्यासाठी सज्ज आहे. हा मॉल महाराष्ट्राच्या रिटेल क्षेत्रातील उत्क्रांतीचा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. यामुळे आता भिवंडीची ओळख केवळ एका औद्योगिक केंद्रापुरती मर्यादित न राहता, मुंबई महानगर प्रदेशातील एक वेगाने विकसित होणारे रिटेल, मनोरंजन आणि जीवनशैलीचे ठिकाण म्हणून भिवंडी नावारूपास येत असल्याचा हा एक महत्त्वपूर्ण संकेत आहे.

अत्याधुनिक रिटेलटेनमेंट हब (खरेदी आणि मनोरंजनाचे ठिकाण) म्हणून डिझाइन केलेल्या या मॉलमध्ये, १५० हून अधिक राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय ब्रँड्सना असणार आहेत. ऑलवेज ऑन डिस्काउंट या स्वरूपात वर्षभर सवलती उपलब्ध असतील, ज्यामुळे ग्राहकांना प्रीमियम फॅशन आणि लाइफस्टाइल उत्पादने आकर्षक किमतीत खरेदी करण्याचा आनंद मिळवता येईल. अरमानी एक्सचेंज, सुपरड्राय, लॅकोस्टे, लिवाइज, एसिक्स, कॅल्विन क्लाइन, टॉमी हिलफिगर, जॅक अँड जोन्स, वेरो मोडा यासारखे आघाडीच्या ब्रँड्स या मॉलमध्ये दाखल होत आहेत. उंची ब्रँड्सचे कपडे, पादत्राणे आणि ॲक्सेसरीज अशा विविध श्रेणीतील उत्पादनांची मनोसोक्त खरेदी याठिकाणी करता येईल.आउटलेट मॉल ऑफ इंडियाची संकल्पना केवळ खरेदीपुरती मर्यादित नाही. अतिशय आनंद व समाधान देणारे, कायम लक्षात राहतील असे अनुभव देणारे ठिकाण म्हणून याची ख्याती निर्माण व्हावी हा यामागचा उद्देश आहे.

३ चला पर्यटनाला

आसामचे काझीरंगा उद्यान

भारतातील आसाम राज्यातील गोलाघाट आणि नागाव जिल्ह्यात स्थित काझीरंगा हे एक अतिशय प्रसिद्ध राष्ट्रीय उद्यान आहे. काझीरंगा राष्ट्रीय उद्यान हे जगातील असेच एक राष्ट्रीय उद्यान आहे जे एक शिंगे असलेल्या गेंड्यांच्या सर्वात जास्त संख्येसाठी प्रसिद्ध आहे. तसेच या राष्ट्रीय उद्यानाला १९८५ मध्ये जागतिक वारसा स्थळ म्हणून घोषित करण्यात आले आहे. काझीरंगा राष्ट्रीय उद्यानाची जतन केलेली आणि राखलेली जैवविविधता त्याला खूप खास बनवते. काझीरंगा बद्दल एक कथा अशी आहे की १६ व्या शतकात, श्रीमंत शंकरदेव नावाच्या एका संत-विद्वानाने काझी आणि रंगाई नावाच्या एका निपुत्रिक जोडप्याला आशीर्वाद दिला आणि त्यांना या ठिकाणी एक तलाव बांधण्यास सांगितले जेणेकरून त्यांचे नाव कायमचे लक्षात राहील.



संकलन संयोजन
सुबोध रणशेवरे
संपर्क -९८३३१४६३५६
इमेल -
subodh.ranshevre
@rediffmail.com

या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

दैनिक सूर्योदय

रविवार ०५ एप्रिल २०२६



या जागेसाठी जाहिरात घेणे आहे

# उल्लेखनीय सामाजिक कार्याबद्दल संभाजी महाडिक यांना ज्येष्ठ समाजसेवक पुरस्कार प्रदान

चिपळूण :- सामाजिक क्षेत्रात समाजकार्यात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल धामापूर गावचे ज्येष्ठ समाजसेवक संभाजी महाडिक यांना नवभारत समूहाचा अत्यंत सन्मानाचा ज्येष्ठ समाजसेवक पुरस्कार रत्नागिरी सिंधुदुर्ग सन्मान सोहळ्यात शनिवारी चिपळूण मधील अतिथी सभागृहात आयोजित कार्यक्रमात प्रदान करण्यात आला.ङ्गआपला पारंपरिक चणे-शेंगदाणेचा व्यवसाय सांभाळून महाडिक यांनी समाज कार्य सुरु ठेवले आहे. १९८६ मध्ये ते गावी गेले. तिथे त्यांनी किराणा मालाचे दुकान व पीठाची गिरण चालवली.

याच दरम्यान, गावातील विकासाकडे त्यांचे लक्ष गेले. गावात वीज आणणे, रस्ते, पाणी योजना यासाठी त्यांनी प्रयत्न केले. गरजू रुग्णांना रुग्णालयात नेणे व त्यांच्यासाठी थोडाफार खर्च करणे या सेवेतही त्यांनी स्वतः झोकून दिले. स्व. गोविंदराव निकम यांचा परिस्पर्शही त्यांना लाभाला.चिपळूण नागरी सहकारी पतसंस्थेचे संस्थापक अध्यक्ष सुभाषराव चव्हाण यांच्या हस्ते सन्मानपत्र देऊन त्यांना गौरविण्यात आले.आ.शेखर निकम यांनीही संभाजी महाडिक यांचे विशेष अभिनंदन केले.या सन्मान सोहळ्याला चिपळूणचे आमदार शेखर निकम,

भाजपा जिल्हाध्यक्ष प्रशांत यादव,सुभाषराव चव्हाण,संजय मलमे,नवभारतचे महा व्यवस्थापक सचिन फुलपगार,सौ.स्वप्ना यादव,उपनगराध्यक्षा रुपाली दांडेकर,सौ.स्मिता चव्हाण,दापोली विद्यापीठाचे संतोष सावर्डेकर,अभिनेत्री साक्षी गांधी,नगरसेवक शुभम पिसे,संभाजी महाडिक,मीना महाडिक,उमेश महाडिक, नेहा महाडिक,अमेय महाडिक,सेजल महाडिक आदी मान्यवर उपस्थित होते.



# खेडमध्ये रोहित प्रमोद ओतारी ‘मसल फॅक्टरी जिम’चे दमदार उद्घाटन; नगराध्यक्ष ॲड. वैंभव खेडेकर यांच्या प्रमुख उपस्थिती



खेड, (प्रतिनिधी): २ एप्रिल २०२६ रोजी शिवनेरी नगर, पाटणे रेस्टॉरंट शेजारी, खेड भरणे रोड येथे रोहित प्रमोद ओतारी यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या अत्याधुनिक ‘‘मसल फॅक्टरी जिम’’ चे उद्घाटन सोहळा मोठ्या उत्साहात पार पडला.ङ्गया जिमचे उद्घाटन मिस्टर वर्ल्ड चॅम्पियन गोल्ड मेडलिस्ट महेंद्र चव्हाण यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी भाजपा नेते तथा खेड नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष ॲड. वैभव खेडेकर यांची प्रमुख उपस्थिती लाभली.ङ्गउद्घाटनानंतर उपस्थित मान्यवरांनी जिममधील अत्याधुनिक व्यायाम यंत्रसामग्रीची पाहणी केली तसेच स्वतःही व्यायामाचा अनुभव घेतला. रोहित ओतारी यांनी परिसरातील युवकांसाठी आधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्याबद्दल त्यांचे कौतुक करण्यात आले.ङ्गही जिम युवकांमध्ये आरोग्यदायी व तंदुरुस्त जीवनशैलीला चालना देणारी ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला.ङ्गया कार्यक्रमाला खेड नगर परिषदेच्या नगराध्यक्षा माधवी बुटाला, उपनगराध्यक्ष सतीश उर्फ पप्पू चिकणे, जिल्हा परिषद सदस्या मानसी जगदाळे, भाजपा खेड शहर अध्यक्ष भालचंद्र (नंदू) साळवी, युवा मोर्चा जिल्हा सरचिटणीस अँड. मिलिंद (दादू) नांदगांवकर, उद्योजक शैलेश मेहता,अमित कदम,अमर दळवी तसेच अनेक मान्यवर उपस्थित होते.ङ्गकार्यक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

# केळशीतील महालक्ष्मी देवीचा यात्रोत्सव जल्लोषात संपन्न

दापोली प्रतिनिधी :-निसर्गरम्य शांत समुद्रकिनारी असलेल्या केळशीतील प्रसिध्द स्वयंभू महालक्ष्मी देवाचा हनुमान जयंतीच्या दिवशी चैत्र पौर्णिमेला होणारा वार्षिक यात्रोत्सव दि. २ एप्रिल रोजी जल्लोषात संपन्न झाला. यावेळी भाविकांचा जनसागर लोटला.ङ्गदापोली तालुक्यातील केळशीचे श्री महालक्ष्मीचे मंदिर हे वास्तू पेशवेकालीन असल्याचे सांगितले जाते. चेत्र शुध्द अष्टमी ते चैत्र पौर्णिमा या कालावधीत प्रथेप्रमाणे उत्सव संपन्न झाला. जत्रोत्सवातील विविध समाजातील लोकांना ठरल्याप्रमाणे त्यांचे मान दिले जातात. गावातील लोकसुध्दा देवीची सेवा करण्यासाठी आपल्याला मिळाले आले हे आपले भाग्यच समजून कित्येक वर्षापासून चालत आलेली परंपरा आजतागायत जपत आलेले आहेत.ङ्ग रथाला खांदा लावण्यासाठी लोकांची झुंबड उडत असते. प्रत्येकजण आपल्याला या



महालक्ष्मी मातेच्या रथाला खांदा लावून सर्वामुखी जगदंबेचा उदो म्हणून जीवन आपले भरून पावले असे समजतो. रथाची खेचाखेची काहींना त्रासदायक वाटत असली, तरीसुध्दा महालक्ष्मी मातेचा उदो उदोच्या गजरात सारे खांदा लावणारे खांदेकरी आपली भूक ताण विसरून अगदी तल्लीन होऊन जातात. दिवसभराच्या रथोत्सवाच्या निमित्ताने गावभर रथासोबत असताना ग्रामपंचायतीने गावात केलेली विकास कामे फेरफटका मारणाऱ्या अनेक लोकांच्या नजरेस पडली आणि गाव विकासासाठी तरूण तडफदार हुशार व्यक्तिमत्व का असावे, याची प्रचिती देखील लोकांना आली.ङ्ग रथोत्सवाच्या आदल्या दिवशी संपूर्ण केळशी पंचक्रोशी व इतर परगावातून येणाऱ्या चाकरमान्यांना देवीचा प्रसाद म्हणून जेवणाचा कार्यक्रम मंदिरामध्ये संपन्न झाला. रथोत्सवाच्या निमित्ताने महालक्ष्मी यात्रेचा मुखवास आकर्षक होता. मुखवास म्हणजेच देवीचा सोन्याचा तयार केलेला मुखवटा असतो. त्याचे दर्शन घेण्यासाठी मंदिरात लांबच लांब रांग लागते. सर्व भाविक मोठया उत्साहात मंदिरात होणाऱ्या कीर्तनासाठी अंथरूण पांघरूण घेऊन मंदिरात वस्तीसाठी हजेरी लावतात. सकाी देवळात गोंधळ असतो. कीर्तनकार आधुनिक विषयावर लोकांना पचनी पडेल, अशा विषय निवडून कीर्तनकार कीर्तन करून लोकांना उपदेश करतात.ङ्ग सकाळी सहा वाजता देवीची स्थापना स्थान करून आरती झाल्यानंतर महालक्ष्मी मंदिरापासून गावभर रथ फिरविला जातो. अनेक जातीचे लोक या उत्सवात जातीभेद न करता संगनमताने एकत्र येऊन देवीची सेवा करतात. रथांवर विशिष्ट पोशाखात असलेले भालदार, चोपदार असतात.ते सर्वांचे लक्ष वेधून घेतात. प्रत्येकांच्या घरी देवीला नवस करून आपली मनोकामना त्या मातेसमोर प्रकट केली जाते. ही देवी नवसाला पावणारी म्हणून प्रसिध्द आहे. म्हणून अनेक लोक, स्त्रिया, पुरूष देवीपुढे आपले गाहाणे प्रकट करतात व दुसऱ्या वर्षा तो नवस फेडण्याची प्रथा ही परंपरेने चालत आलेली आहे. मंदिरामध्ये आकर्षक रोषणाई केली जाते. पारंपारिक पध्दतीने मंदिरातील मंडपाची सजावट केली जाते व काचेच्या हडीत खोबरेल तेलावर पणत्या लावल्या जातात आणि याच रोषणाईत मंडपात कीर्तन संपन्न होते.

# मानखुर्द पी.एम.जी कॉलनी आंबेडकर नगरमध्ये नाल्यात कचऱ्याचे साम्राज्य; पावसाळ्यात गंभीर परिस्थितीची भीती

मुंबई.(प्रतिनिधी): मानखुर्द परिसरातील आंबेडकर नगर पी.एम.जी कॉलनी येथे नाल्यात मोठ्या प्रमाणात कचरा साचल्याने स्थानिक रहिवाशांना तीव्र त्रास सहन करावा लागत आहे. नाल्यात प्लास्टिक पिशव्या, बाटल्या आणि इतर घनकचऱ्याचा ढिग साचलेला असून परिसरात अस्वच्छता आणि दुर्गंधीचे वातावरण निर्माण झाले आहे.

स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, या नाल्याची वेळोवेळी साफसफाई होत नसल्यामुळे परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत आहे. नाल्यातील कचऱ्यामुळे पाण्याचा प्रवाह अडथळला जात असून, त्यामुळे डासांचे प्रमाण वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे आरोग्याच्या समस्या उद्भवण्याची भीतीही व्यक्त केली जात आहे.

विशेषतः येणाऱ्या पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर ही समस्या अधिकच बिकट होण्याची शक्यता आहे. नाला तुंबल्यास पाणी रस्त्यावर व घरांमध्ये शिरण्याचा धोका आहे, असे स्थानिक नागरिकांनी सांगितले.ङ्गनागरिकांनी तातडीने नाल्याची स्वच्छता करून योग्य उपाययोजना करण्याची मागणी केली आहे.

महानगरपालिकेने वेळेत लक्ष न दिल्यास पावसाळ्यात मोठ्या प्रमाणात गैरसोयी आणि आरोग्यधोके निर्माण होऊ शकतात, अशी भीती व्यक्त केली जात आहे.



भरत सरपरे (संपादक कोकण आवृत्ती), संपर्क : ९०४९८११०६५ मु. भिंगळोली पो.ता.मंडणगड जि.रत्नागिरी, कोकण विभागीय कार्यालय पत्ता : निलेश महादेव आखाडे ०६ र.न.प.वसाहत नाचणे रोड रत्नागिरी.४१५६१२

हे पत्र मालक, प्रकाशक संपादक गंगाधर सिताराम काळकुटे यांनी माऊली ऑफसेट प्रिंटर, एम.एस.ई.बी. ऑफीसजवळ, माळीवेस बीड- ४३११२२ येथे छापून दैनिक महाराष्ट्र सूर्योदय, हॉटेल रायगड, जिल्हाधिकारी ऑफीससमोर, नगर रोड, बीड ४३११२२ येथे प्रकाशित केले. मुख्य कार्यालयः जिल्हाधिकारी कार्यालया समोर, नगर रोड, बीड मुख्य संपादकः गंगाधर काळकुटे मो. ९८५४८९८९८९ , अंकामधील छापून आलेल्या मजकुराशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (वाद बीड न्यायकक्षेत )